भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या माध्यमिक आश्रमशाळेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन निर्णय क्रमांकः विभशा २०१५/प्र.क्र.२८४/विजाभज-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
तारीख: १६ मे , २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय क्र. विभशा २०१५/प्र.क्र.२८४/विजाभज-२, दि. १ डिसेंबर २०१६

२. शासन निर्णय क्र. विभशा २०१७/प्र.क्र.३०१/विजाभज-२, दि. १५ जानेवारी २०१८

३. शासन निर्णय क्र. विभशा २०१५/प्र.क्र.२८४/विजाभज-२, दि. ७ मे, २०१८

४. शासन निर्णय क्र. विभशा २०१२/प्र.क्र.२९९/विजाभज-२, दि. ३० ऑक्टोंबर, २०१३

प्रस्तावना:-

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक आश्रमशाळेस जोडून निवासी माध्यमिक आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदासह **"विशेष बाब"** म्हणून मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने दि. २५.१०.२०१६ च्या बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार विभागाच्या दि. १ डिसेंबर,२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. मा.मंत्रीमडळाने दि. २५.१०.२०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या माध्यमिक आश्रमशाळेतील एकूण १४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदांच्या पदांना वाचा क्र०३ च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली होती. सदर मंजुरी देताना संबंधीत पदांची वेतनश्रेणी नमुद केलेली नसल्याने तसेच इतर आवश्यक त्या अटी व शर्तींचा अंतर्भाव केलेला नसल्याने सदर शासन निर्णय अधिक्रमित करून नव्याने मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता खालीलप्रमाणे शासन मंजुरी देण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

शासनाने दि.०७ मे २०१८ रोजीचा शासन निर्णय निर्गमत केला होता. सदर शासन निर्णय परिपूर्ण नसल्याने तो अधिक्रमित करण्यात येवुन सदर सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान,सोलापूर या संस्थेच्या मंगरुळ (यमगरवाडी) ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे कार्यरत असणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक आश्रमशाळेस जोडून निवासी माध्यमिक आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदासह **"विशेष बाब"** म्हणून मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने दि. २५.१०.२०१६ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विभागाच्या दि. १ डिसेंबर,२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत माध्यमिक आश्रमशाळा सुरु असल्याने या आश्रमशाळेमध्ये सध्या कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व शासनाच्या आश्रमशाळा संहिता यामध्ये नमूद खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे पूर्ण करीत असतील त्याचप्रमाणे सदरहू कर्मचारी इतर अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील त्यांचे खालील पदांमध्ये समायोजन करून राज्य मंत्रीमंडळाने मान्य केलेली खालीलप्रमाणे १४ पदे पुढील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पद संख्या	वेतनश्रेणी (रूपये)	शैक्षणिक अर्हता	शेरा
१)	मुख्याध्यापक	१	९३००-३४८००+ग्रेड पे ४८००/-	बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी.+बी.एड.	नियमित
२)	शिक्षण सेवक	४	ठोक मानधन दरमहा रू.८०००/- याप्रमाणे प्रथमत: ०३ वर्षांकरीता	बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी.+बी.एड त्याचप्रमाणे MSC-IT उत्तीर्ण असणे आवश्यक.	सदर शिक्षण सेवकांची ०३ वर्षे सेवा समाधानकारक असल्यास व संस्थेने त्यांच्या कायम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यास सादर केल्यास सक्षम प्राधिकारी यांनी सदर शिक्षण सेवकास सहाय्यक शिक्षक पदावर कायम मान्यता देताना त्यास रू. ९३००-३४८००+ग्रेड पे ४२००/- ही वेतनश्रेणी लागू राहील.
३)	कनिष्ठ लिपिक	१	५२००-२०२००+ग्रेड पे १९००/-	एच.एस.सी. व टंकलेखन परिक्षा मराठी ३० (श.प्र.मि.) व इंग्रजी ४० (श.प्र.मि.) उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित

४)	प्रयोग शाळा सहायक	१	५२००-२०२००+ग्रेड पे २०००/-	इ.१२ वी विज्ञान उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित
५)	शिपाई	३	४४४०-७४४०+ग्रेड पे १३००/-	इ.४ वी उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित
६)	वसतिगृह महिला अधिक्षक	१	५२००-२०२००+ग्रेड पे २८००/-	वाचा येथील क्र.०४ मध्ये नमुद शासन निर्णयाप्रमाणे असणे आवश्यक.	नियमित
७)	स्वयंपाकी	१	४४४०-७४४०+ग्रेड पे १६००/-	इ.४ वी उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित
८)	मदतनीस	१	४४४०-७४४०+ग्रेड पे १३००/-	इ.४ वी उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित
९)	कामाठी	१	४४४०-७४४०+ग्रेड पे १३००/-	इ.४ वी उत्तीर्ण असणे आवश्यक.	नियमित
	एकूण	**१४**			

१. सदरहू पदे सन २०१७-१८ च्या शैक्षणिक वर्षाच्या संच मान्यतेच्या अधीन राहून मान्य असतील. सदर पदे प्रत्यक्षातील विद्यार्थी संख्या व मान्य निवासी संख्येच्या अधीन राहून प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण यांनी मंजुर करावीत.

२. मंजुर पदांसाठी विद्यार्थी संख्येची अट कोणत्याही परिस्थितीत शिथील केली जाणार नाही किंवा त्यामध्ये सुट दिली जाणार नाही.

३. सद्य:स्थितीत माध्यमिक आश्रमशाळा सुरु असल्याने या शाळेमध्ये सध्या कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांव्यतिरीक्त नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येणार नाही. नवीन कर्मचारी नियुक्तीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास जिल्हा, प्रादेशिक विभाग किंवा राज्य स्तरावरील अतिरीक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून कर्मचाऱ्यांची समायोजनाने नियुक्ती करण्यात यावी.

४. सदरील पदे लेखी व तोडी परीक्षा घेउुन भरलेली असावीत.

५. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अर्हतेची अट कोणत्याही परिस्थितीत शिथिल केली जाणार नाही.सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे शालेय शिक्षण विभागाने निर्धारित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार भरलेले असावेत अन्यथा अशा पदांना मान्यता देण्यात येवू नये.

६. शिक्षकांचे पदासाठी संबंधित शिक्षकांनी शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. ज्या शिक्षकांची अथवा शिक्षण सेवकांची नियुक्ती ही सन २०१३ पूर्वीची असेल अशा शिक्षकांना अथवा शिक्षण सेवकांना ही शिक्षक पात्रता परिक्षा मान्यता दिलेल्या तारखेपासून दोन वर्षांत उत्तीर्ण करणे बंधनकारक असेल. जे शिक्षक अथवा शिक्षण सेवक ही परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण करणार नाहीत त्यांची सेवा सदर कारणास्तव तात्काळ समाप्त करण्यात यावी.

७. सदरहू माध्यमिक आश्रमशाळेस या विभागाच्या आश्रमशाळा संहितेतील सर्व अटी व शर्ती आणि नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

८. वरील १४ पदांना संबंधित कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व आरक्षण विषयक धोरण विचारात घेउन वैयक्तीक मान्यता देण्याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही वाचा येथील क्र.०२ मध्ये नमुद शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ करावी.

सदर माध्यमिक आश्रमशाळेसाठी वेतन व वेतनेतर बाबींकरीता लागणारा खर्च लेखाशिर्ष मागणी क्र.झेडजी-३, २२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण,२७७-शिक्षण,(०१) विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (०१) विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्यासाठी आश्रमशाळा व मुलोद्दोगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम) (दत्तमत) (२२२५ई८६६) या लेखाशिर्षांतर्गत तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने विशेष बाब म्हणून मंजुरी दिल्यामुळे सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र २०१८०५१७१७०२१८९६२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S. A. Pedgaonkar

Digitally signed by S. A. Pedgaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b2ac85a22a7c244beaad68d7bf50398b67204dc905155ddd4219e64a8ba0c058, cn=S. A. Pedgaonkar
Date: 2018.05.17 17:12:36 +05'30'

(सु.अ.पेडगांवकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई .
३. मा. मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई .
४. मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई.

५. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव वित्त विभाग मंत्रालय मुंबई
६. सचिव विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग मंत्रालय मुंबई .
७. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. धर्मदाय आयुक्त अमरावती विभाग.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
१०.महालेखाकार (वित्त व लेखा) महाराष्ट्र ½ मुंबई / नागपूर
११.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग लातूर
१२.सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण उस्मानाबाद
१३.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
१४.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५.सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे,मुंबई.
१६.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र (मुंबई/नागपूर)
१७.महालेखापाल, लेखापरिक्षा, महाराष्ट्र (मुंबई/नागपूर)
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद.
१९. अध्यक्ष/सचिव, भटके विमुक्त प्रतिष्ठान,७९४,दक्षिण कसबा, शिवस्मारक जवळ, सोलापूर.
२०.निवडनस्ती, कार्यासन-विजाभज-२